MHJN090001662009

आर.सी.एस. ११२/२००९
उमेश वि. किसनराव

**नि.क्र.१२४ वरील आदेश**

१. वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता व तुटक कब्जा करिता दाखल केलेला आहे. दावा प्रलंबीत असताना वादीने प्रतिवादी क्र. ४,५,६,१०,११,१२ १५,१९,२२,२३,२४,२५, २९ व ३१ यांचे विरुद्ध वेळेत तजवीज केली नाही म्हणून त्यांचे विरुद्ध दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ५ अंतर्गत दि. २७.०९.२०२४ रोजी काढून टाकण्यात आला. त्यानंतर वादीने सदर आदेश रद्दबातल करणे करिता कोणताही अर्ज दाखल केला नाही. दरमयानच्या काळात प्रतिवादी क्र. ६ सौ. विजया लक्ष्मी अमितकुमार जैस्वाल हीने निशाणी १२४ कडे अर्ज दाखल करुन तिला दावेकामी पुन्हा समाविष्ट करुन घेण्यात यावे म्हणून दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अंतर्गत न्यायालयाकडे अर्ज दाखल केला.

२. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० चा मुख्य उद्देश हा आवश्यक असलेल्या सर्व पक्षकारांना दावेकामी समाविष्ट करणे अगर ज्यांची उपस्थिती दाव्याच्या अंतिम न्यायनिर्मितीकरिता आवश्यक नसेल अश्यांना दावेतून कमी करणे हा आहे.

३. सौ. विजयालक्ष्मी जैस्वाल या यापूर्वीच दावेकामी आवश्यक पक्षकार म्हणून वादी मार्फत समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. परंतु, वादीने वेळोवेळी संधी देउनही त्यांच्या करिता योग्य ती तजवीज केली नाही म्हणून त्यांचे विरुद्ध दावा काढून टाकण्यात आला. वादीने जाणुनबुजून प्रतिवादी क्र. ६ जी दावेकामी आवश्यक पक्षकार आहे तिच्या करिता तजवीज केली नसल्यामुळे वादी हा सर्वतः आवश्यक पक्षकाराअभावी त्याच्या दावेस भविष्यात निर्माण होणा–या अडचणीस जबाबदार असणार आहे. त्यामुळे अशा

परिस्थतीत प्रतिवादी क्र. ६ हिला आदेश १ नियम १० अंतर्गत  पुन्हा नव्याने प्रतिवादी म्हणून दावेकामी समाविष्ट करता येणार नाही तसे केल्यास तो न्यायालयीन तरतुदींचा दुरुपयोग ठरणार आहे. जर सौ. विजयालक्ष्मी या दावेत समाविष्टच नसत्या तर त्यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अंतर्गत दावेकामी समाविष्ट होण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला असता. परंतु, ज्या अर्थी वादीने त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून दावेत समाविष्ट केले व त्यांना नोटीस पाठवून दावेकामी हजर ठेवण्याकरिता कोणतीही तजवीज वादीने केली नाही व परिणामी दावा त्यांच्या विरुद्ध काढून टाकण्यात आला त्याअर्थी पुन्हा सौ. विजयालक्ष्मी यांना दावेकामी समाविष्ट करता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2025.05.09 15:48:21 +0530

दि.०९.०५.२०२५

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.